**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन....

**(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)**

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. विनियोजन विधेयक मंजूर झाल्यानंतर मी आपल्याला बोलण्याची संधी देतो. विनियोजन विधेयक मंजूर झाले तरी सुद्धा आपण मागणी केल्याबरोबर लगेचच विनियोजन विधेयकामध्ये ती बाब समाविष्ट होऊ शकत नाही.

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** अध्यक्ष महोदय, माननीय अर्थ मंत्र्यांनी तसे आश्वासन द्यावे. सन्माननीय सदस्यांची आमदार निधीची मागणी ३ कोटी रुपये आहे. माननीय श्री. अजित पवारांनी ५ कोटी रुपये मान्य केले होते. डोंगरी विकास निधीकरिता १ कोटी रुपये तरी द्यावेत.

**अध्यक्ष :** माननीय मंत्री महोदय, आपण विधेयक मांडावे.

---

**L. A. BILL No. XII OF 2011**

**( A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2011-2012 )**

**श्री. अजित पवार** (वित्तमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०११ चे वि. स. वि. क्रमांक १२-राज्याच्या एकत्रित निधीतून २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक सभागृहासमोर मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे.

**अध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

**श्री. अजित पवार :** महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०११ चे वि. स. वि. क्रमांक १२ राज्याच्या एकत्रित निधीतून २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**अध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ व ३, अनुसूची विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

**श्री. अजित पवार :** अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०११ चे वि. स. वि. क्रमांक १२, संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**अध्यक्ष :** सन २०११ चे वि. स. वि. क्रमांक १२ संमत झाले आहे.

---

## अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

**श्री. किसन कथोरे** (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे तिसरे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक १ एप्रिल, २०११ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी सकाळी १०.३० वाजता समितीची बैठक झाली.

पुर:स्थापनार्थ २ अशासकीय विधेयके आहेत त्यांना अंदाजे १० मिनिटे लागतील त्यामुळे पुर:स्थापनार्थ असलेल्या विधेयकांकरिता देण्यात येणारा वेळ वगळता १४० मिनिटांचा वेळ पुढीलप्रमाणे अशासकीय ठरावांना देण्यात यावा अशी समितीने शिफारस केली आहे.

**विद्यमान सत्रात दिवसाच्या कामकाजाच्या पत्रिकेत दाखविलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला ठराव :—**

(१) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - ३१८ ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**बॅलटमधील प्राथम्य क्रमानुसार असलेले ठराव :**

(१) श्री. सुधाकर भालेराव, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - १९ ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(२) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - ३२५ ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(३) श्री. जगन्नाथ शेट्टी, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - २४१ ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात यावा, अशीही समितीने शिफारस केली आहे.

**अध्यक्ष :** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे तिसरे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

**श्री. किसन कथोरे :** अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे तिसरे प्रतिवृत्त संमत करावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---